
जुलै - ऑगस्ट १९९४
वर्ष २ रे अंक ४ था
मूल्य - १० रु.

# नॉर्थ - वेस्ट नेटवर्क



नॉर्थ-वेस्ट नेटवर्क

वर्ष २ रे अंक ४ था
जुलै-ऑगस्ट १९९४

व्यवस्थापकीय संचालक:
राबिया हिरा
टाईप सेटींग: कमलदिप सिंह
कला: वेणू रेड्डी

संपादकीय, जाहिरात व
वितरणाबाबत
व पत्रव्यवहाराचा पत्ता: नॉर्थ-वेस्ट
नेटवर्क, हिरा प्रोसेसर्स व पब्लिशर्स,
सुकेणकर बिल्डींग, पंचवटी
हॉटेलसमोर, नाशिक - ४२२ ००१
दूरध्वनी: ७११३३
फॅक्स (०२५३) ७१६००

जळगांव: नीना कुलकर्णी,
८, श्रीरंग, एस.आय.सी. कॉलनी,
शाहूनगर, जळगांव.
दूरध्वनी: (०२५७) २३२३७

अहमदनगर: अनुरीता साकट,
द्वारा डी-२, आकाशवाणी टॉवर क्वार्टर्स,
अहमदनगर

धुळे: रावसाहेब गरूड,
बागेश्री, गरूड बाग, धुळे.
दूरध्वनी: (०२५६२)
२४४०८ / २४६४२

*हे मासिक हिरा प्रोसेसर्स आणि पब्लिशर्स, 'शिवांगी' त्र्यंबकरोड समोर, नाशिक - ४२२००२ साठी राबिया हिरा यांनी संपादित व प्रकाशित केले.*
*छपाई: इन्कॉनपेपर, शाह-नाहर इंडस्ट्रियल इस्टेट, लोअर परेल, मुंबई.*
*कॉपीराईट राखीव. या मासिकातील काही भाग वा संपूर्ण लेखाचे पुनर्मुद्रण संपादकांच्या परवानगीशिवाय करू नये. या मासिकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.*

# अनुक्रमणिका

**वासनाकांड :** सौ. सुषमा गरूड .................... २
**आजचा 'शिष्टाचार' :** सौ. सुधा कुळकर्णी ........... ३
**मुखपृष्ठ :** भवरलाल जैन .............................. ५
**प्रश्नव्युह :** आर. वैंकिटाचलम ....................... ८
**मुखपृष्ठ (इंग्रजी):** सिद्धी ............... ........... १०
**वचपा (कथा) :** सौ. अंजली कुलकर्णी ... .......... १२
**लग्न ?... :** सौ. राधिका गोडबोले ................. १४
**मध (शहद) :** सतिश वसंत शिंदाडकर ... .......... १६
**तारांबळ :** संध्या प्रकाश ............................ २०

मुखपृष्ठ:
भवरलाल जैन
चेअरमन, जैन उद्योग समुह
जळगांव

छायाचित्रकार:
रणजित हिरा

# मनोगत

*लग्नाच्या गाठी स्वर्गात मारल्या जातात असे म्हणतात स्वर्गात मारलेल्या या गाठी पृथ्वीवर जेव्हा पक्क्या होतात तेव्हा परस्पर सहजीवन सुरू होते. सहजीवन सुरू होण्यापूर्वी याबद्दल खूप रम्य कल्पना प्रत्येक तरुण-तरुणींच्या मनात असतात पण नाविन्याचे काही दिवस ओसरल्यावर अनेकदा सहजीवनाचे तारू डगमगू लागते, मतभेदांच्या वादळात हेलकावे घेऊ लागते आणि वादळ फारच उग्र असेल तर घटस्फोटाच्या खडकावर आपटून हे तारू फुटते, तुटते. भोवतालच्या सामाजिक परिस्थितीचा अनिवार्य असा परिणाम विवाहसंस्थेवर होतो आहे हे बदलल्या सामाजिक स्थित्यंतराकडे पाहून म्हणावेसे वाटते. काही वर्षापूर्वी समाज जेव्हा एकसंध होता, माणसा माणसातील नात्यांना अर्थ होता तेव्हा विवाहसंस्थाही दृढ होती. मतभेद तुटेपर्यंत ताणण्याची अटीतटी त्यात नव्हती. काही वाद झाल्यास मोठ्यांचा हस्तक्षेप होई आणि प्रकरण सामंजस्याने मिटे. सहजीवनात जेव्हा दोन भिन्न व्यक्ति एकत्र येतात तेव्हा थोडी मतभिन्नता, मतभेद होणारच अशी धारणा तेंव्हा होती. पण आता जसे व्यक्ति स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले तशी ही धारणा. ढासळू लागली आहे. स्वतःचे स्वातंत्र्य, स्वतःची सुखे, स्वतःचा विकास, करियर या गोष्टींना अतोनात महत्व आले, इतके की त्याच्या मार्गात येणारा कोणताही अडसर सहन होत नाही. प्रत्येक बाबीत एकमेकांशी तुलना सुरू झाली की परस्परांसाठी जगण्यातील सुख संपते. पूर्वी नवऱ्यांसाठी, कुटुंबासाठी खस्ता खात घराच्या उंबरठ्याआड जगणाऱ्या स्त्रिया आणि आता स्वतःचे करियर, व्यक्तिविकास, प्रगती यासाठी झगडणाऱ्या स्त्रिया ही दोन टोके सांधून, मध्यममार्ग निघाल्यास सहजीवन अधिक अर्थपूर्ण बनू शकेल. मानवी नात्यांचा तळ शोधून, त्यातील गहिरे रंग शोधणारी काही जोडपी आज दिसतात पण ती हाताच्या बोटावर मोजण्याइतकी एरवी सर्वत्र नीरस कर्कश्यता दिसते. केवळ विवाह केलेल्या पती-पत्नींचेच नव्हे तर समाजातील माणसांचे परस्परांशी होणारे व्यवहार शुष्क, कोरडे होत चालले आहेत. स्नेहाचा सुखद स्निग्ध स्पर्श या नात्याला देता येणार नाही कां? माणसा-माणसातील नात्यांना विसरून ज्या भौतिक गोष्टींमागे आपण धावतोय त्या गोष्टी कधीच चिरंतन नसतात पण माणसातील नाते मात्र सदैव ताज्या सुगंधासारखे असते ते आधी जपायला हवे. म्हणून हा सहजीवन विशेषांक. 'नॉर्थ-वेस्ट'चा हा दुसरा वर्धापनदिन. वाचकाचे भरभरून प्रेम अक्षय राहो ही यानिमित्ताने विनंती.*

— **प्रकाशक**

# भवरलाल जैन : समृद्ध व्यक्तिमत्व

काही गावे अशी असतात की एखाद्या व्यक्तिमुळे त्या गावाचे नाव नकाशावर ओळखले जाते. त्या व्यक्तिचे कर्तृत्व हे त्या शहराचे भूषण होऊन बसते. जळगांव हे असेच एक गाव. केळ्यांसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव आता जैन पाईपमुळे ओळखले जाते आहे आणि जैन पाईप्स म्हटले की आठवतात ते भवरलाल जैन जळगावला स्वत:चा चेहरा मिळवून देणारे एक संपन्न व्यक्तिमत्त्व. शून्यातून विश्व निर्माण करणारे.

कायद्याची पदवी आणि खिशात दहा रूपये एवढ्या भांडवलावर भवरलाल यांनी तरूण वयात रॉकेल विक्रीचा व्यवसाय सुरू केला. त्यांचे घराणे प्रतिष्ठित, शेती करणारे पण या नव्या व्यवसायाला घरून पाठिंबा मिळाला आणि एका ज्योतिष्याने भविष्य वर्तविले ''हा तरूण लवकरच लोखंड, माती आणि तेलाचा मोठा व्यावसायिक होईल.'' रॉकेल कडून रिक्षाचे सुट्टे भाग, लुब्रिकेटिंग ऑईल, पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस, पेपेन, पी.व्ही.सी. पाईप, ठिबक सिंचन, उच्च दाबाचे ट्रान्सफॉर्मर्स अशा असंख्या दिशांनी भवरलाल यांनी आपला व्यवसायाचा व्याप वाढविला आणि जळगावच्या प्रगतीशी आपल्या व्यवसायाचे नाते गुंफले. सामाजिक जाण असलेला एक हाडाचा उद्योजक असा आज भवरलाल यांचा लौकीक आहे, केवळ महाराष्ट्रात नव्हे तर जगभरात. अर्थात केवळ व्यवसाय आणि व्यवसाय हेच त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट नाही. विविध कलांवर प्रेम असणाऱ्या भवरलाल जैन यांनी नाशिकचे शिल्पकार सुधीर देशपांडेसारख्या कलाकाराला प्रोत्साहन दिले, 'गिनिज बुक' मध्ये ज्या सर्वात उंच आणि वजनदार शिल्पाची नोंद आहे ते सुधीर देशपांडे यांनी भवरलाल जैन यांच्यासाठी बनवले आहे. भरपूर वाचन, चिंतन आणि सतत नव्याला सामोरे जाण्याची वृत्ती ह्यामुळे आज दोन नातवांचे आजोबा बनलेले भवरलाल मागील पिढीतील वाटत नाहीत. गॅट करारापासून सध्याच्या शिक्षण पद्धतीपर्यंत विविध विषयावर मते व्यक्त करणारी ही मुलाखत खास नॉर्थ-वेस्ट नेटवर्कच्या वर्धापन विशेष अंकानिमित्त घेतलेली आहे.

■ **कामावाबतचे तुमचे स्वत:चे तत्त्वज्ञान काय आहे ?**

केवळ तीन शब्दांमध्ये हे तत्त्वज्ञान सांगता येईल. काम हेच जीवन. या एकाच वाक्यातून आमच्या व्यवसायातील कामाची संस्कृती, तत्त्वज्ञान सांगता येईल.

■ **तुमचे जन्मगांव, जळगांव बाबत तुमच्या काय भावी योजना आहेत ? जळगांवला मॅनेजमेंट कॉलेज सुरू करण्याबाबतची योजना प्रत्यक्षात केव्हा येणार आहे ?**

माझ्या ज्या काही विस्ताराच्या आणि गुंतवणूकीच्या भावी योजना आहेत त्या जळगाव किंवा त्याच्या आसपासच्या भागात राबविण्यासाठी मी स्वत:लाच वचनबद्ध केले आहे. जळगावची भूमी, येथील माती, येथील लोक यांच्यामुळेच मी मोठा झालो असे मी मानतो. हे ऋण फेडण्यासाठी येथील लोकांना काम उपलब्ध करून देणे हे मी माझे कर्तव्य मानतो, माझी जबाबदारी मानतो. विकासात्मक कामाचा पहिला भाग म्हणून सध्या भारतातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणारे केन्द्र सुरू करण्याची योजना हाती घेतली आहे. तो प्रकल्प पूर्णत्वाला गेल्यावर ग्रामीण व्यवस्थापन संस्था सुरू करून मग या योजनेचा शेवटचा टप्पा म्हणजे व्यवस्थापन शास्त्राचे प्रशिक्षण देणारे परिपूर्ण केंद्र सुरू करण्यात येईल.

■ **इस्त्रायली तंत्रज्ञानाचा वापर करून एक आदर्श कृषि प्रकल्प जैन ग्रुपतर्फे सुरू करण्यात येणार आहे, हा प्रकल्प कोठे सुरू होणार आहे ? त्यात कोणत्या प्रकारच्या तंत्रज्ञानाचा समावेश असेल ? आणि त्याचा देशाला कोणत्या स्वरूपात फायदा होईल ?**


जैन फाँडेशनतर्फे इस्त्रायल शासनाच्या एका संस्थेशी करार करण्यात आला आहे कृषि विषयक क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण शेतऱ्यांना देण्यासाठी एक प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. जैन फाँडेशन



आणि सिनॅडको (CINADCO) यांच्या संयुक्त प्रयत्नाने असे पाहिले प्रशिक्षण केंद्र १३ जून ९४ रोजी सुरु झाले. या तंत्रज्ञानाच्या वापराने जमीनीची प्रत सुधारेल आणि उत्पादनाचा दर्जाही सुधारेल आणि त्यामुळे आपोआप शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होईल. या तंत्रज्ञानाचा वापर केल्याने शेतीवर आधारित सर्व उत्पादने आंतरराष्ट्रीय दर्जाची निर्माण होऊन देशाला परकीय चलनाचा लाभ मिळू शकेल. शेतीमालावर आधारीत, फळे वा इतर धान्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांनाही त्यामुळे मदत होऊन राष्ट्रीय आर्थिक धोरणावरही त्याचे परिणाम दिसू लागतील.

■ **पर्यावरणाच्या महत्वाच्या प्रश्नांबाबत आपण विशेष जागरूक आहात, त्यासंदर्भात काही ठोस निर्णय, कार्यक्रम आपण हाती घेतले आहेत काय ?**

पर्यावरणाच्या विविध प्रश्नांबाबत वाटणारी काळजी आमच्या विविध उत्पादनांमधून व्यक्त होते. लघुसिंचन योजनेमुळे पाणी वाचते तर आम्ही जी विविध प्रकारची प्लॅस्टिक शीटस् तयार करतो त्याचा लाकडाऐवजी वापर करता येतो. उर्जा वाचविण्याचा एक उपाय म्हणून सोलर हिटर्सचे (सौर उर्जेवर चालणारे हिटर्स) उत्पादनही आम्ही सुरू करणार आहोत.



■ डंकेल प्रस्तावाबाबत आपले काय मत आहे?

गॅट जागतिक व्यापार परिषदेतील वाटाघाटी व डंकेल प्रस्तावामुळे देशातील कृषि व औद्योगिक क्षेत्राला नक्कीच आर्थिक लाभ होणार आहे. इतरांच्या छायेतून बाहेर पडून, भारताने मुख्य आंतरराष्ट्रीय प्रवाहात आता सामील होण्याची गरज आहे. या प्रवाहात सामील होताना स्पर्धेतील विविध ताणतणावांना आपल्याला सामोरे जावे लागेल परंतु अशी आव्हाने समोर ठाकल्याखेरीज आपला विकास, पुढे वाटचाल होणार नाही. विकसनशील अर्थव्यवस्थेकडून विकसीत अर्थव्यवस्थेकडे प्रवास करायचा तर ही स्पर्धा, त्यातील ताण, नवनवी आव्हाने हे अटळ आहे. औद्योगिक आणि कृषि क्षेत्रात भारतीय हे जगात सर्वोत्तम आघाडीवर असलेल्या देशांच्या तोडीची कामगिरी करू शकतील याविषयी मला पूर्ण विश्वास आहे.

■ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सर्वोच्च स्थान पटकावण्यात भारतीय अुद्योजक मागे पडतात याची कोणती कारणे आहेत असे तुम्हाला वाटते? सर्वोच्च स्थानावर जाण्यासाठी जी व्यावसायिक वृत्ती लागते त्यात आपण भारतीय मागे पडतो असे आपल्याला वाटते का?

मुख्यत: अनेक शासकीय निर्बंध ही भारतीय उद्योजकाच्या पायातील बेडी ठरली आहे असे मला वाटते. जर हे निर्बंध कमी होऊन पुढे जाण्यात अडसर ठरणाऱ्या या बेड्या निघाल्या, समान संधी भारतीय उद्योजकांना मिळाल्या तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय उद्योजक यशस्वी होतील, सन्मानाचे स्थान पटकावतील. नवीन तंत्रज्ञान अवगत करण्याचे कसब आपण कमावले आहे आणि आपल्याकडे उत्पादन खर्च कमी असल्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तो एक फायदा आपल्याला आहे. जर आपण आपली सनातन नैतिक मूल्ये जपू शकलो व त्याची सांगड नवीन तंत्राशी घालू शकलो तर औद्योगिक क्षेत्रात आगामी दशकात आपण सर्वोच्च स्थान नक्कीच पटकावू शकतो.

■ विविध अंगानी वाढणाऱ्या आपल्या व्यवसायाची धुरा आपण गेली अनेक वर्ष यशस्वी पणे सांभाळत आहात, सध्याच्या आर्थिक वातावरणात व्यवसायाची प्रमाणबद्ध वाढ करण्यासाठी, राखण्यासाठी कोणती कौशल्ये, सूत्रे आपण वापरता?

व्यावसायिक वृत्ती ही कोणत्याही व्यवसायाच्या, उद्योगाच्या वाढीची पहिली गरज आहे. याखेरीज संधी शोधणे आणि त्या संधीचे सोने करण्यासाठी धोका पत्करण्याचीही तयारी ठेवणे हेही आवश्यक आहे. उद्योग व्यवसाय वाढवण्यासाठी अडचणीवर मात करून दिलेल्या वेळात आणि ठरवून दिलेल्या आर्थिक तरतुदीमध्येच काम करण्याचा निर्धार असलेल्या स्थिर मनाचीही गरज आहे. ह्या गोष्टी असल्या म्हणजे उपलब्ध साधन सामग्रीचे उत्तम नियोजन हाही एक घटक आहे. पण तो त्या दुसऱ्या टप्प्यात येतो असे मला वाटते.

■ आपल्या देशात मुलांना योग्य शिक्षण दिले आहे असे तुम्हाला वाटते का? नसल्यास त्याबाबत काय करता येईल?

आपल्या भावी पिढ्यांसाठी आपल्या शिक्षण व्यवस्थेचा पूर्णपणे फेरविचार करण्याची आज गरज आहे. स्वतंत्र, चैतन्याने भारलेला आणि सदैव पुढे जाण्याची आस असलेल्या देशासाठी ही मूल्ये देणाऱ्या शिक्षणक्रमाची गरज आहे. सध्याची व्यवस्था भ्रष्टाचारामुळे पूर्ण सडली आहे. त्यामुळे ती बदलण्याखेरीज आता पर्याय उरलेला नाही. आगामी पिढी सुशिक्षित असावी अशी तर गरज आहेच पण कठोर श्रम श्रमप्रतिष्ठा, एकात्मता आणि उद्दिष्ट प्राप्तीसाठी धडपड करण्याची वृत्ती त्यांच्यात बाणायला हवी. या गोष्टींचा मूल्य म्हणून त्यांनी आयुष्यात स्वीकार करायला हवा.

■ तुमचा नातवाला आय.आय.टी.ला पाठवण्याची वेळ आल्यास तुम्ही कोणत्या संस्थेची निवड कराल? अमेरिका-इंग्लंडमधील सर्वोत्तम संस्थांशी भारतातील शिक्षणसंस्थांची तुलना होऊ शकेल? जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था आपण स्थापन कां करू शकत नाही?

माझ्या मते व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या भारतातील सर्व संस्था या जगातील सर्वोत्तम संस्थांच्या तोडीच्या आहेत. पण राजकीय नेते आणि शासकिय अधिकारी यांचा हस्तक्षेप बंद झाला तर! या संस्था चालविण्यास जे लायक आहेत, पात्र आहेत त्यांनीच या संस्थांचा कारभार हाताळल्यास त्या जगातील कोणत्याही सर्वोत्तम संस्थेशी स्पर्धा करू शकतील असे मला वाटते आणि माझ्या नातवाबद्दल विचाराल तर तो त्या वयात आल्यावर कोठे व काय शिकायचे हे स्वत:च ठरवेल.

■ कामाव्यतिरिक्त आपली अन्य व्यवधाने कोणती? काही छंद जोपासायला तुम्हाला वेळ मिळतो कां?

मी भरपूर वाचतो आणि जेव्हा वेळ मिळेल तसा समाजकल्याणासाठी थोडा वेळ देतो हाती घेतलेले काम पूर्णपणे यशस्वी करण्यासाठी स्वत:चे शरीर आणि मनही पूर्णपणे सक्षम ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे मी मानतो त्यामुळे या दोन गोष्टींसाठी मी निश्चितच वेळ देतो.

■ आपल्याला आवडणारी पाच पुस्तके कोणती?

एखादे विशिष्ठ आवडते पुस्तक सांगणे अवघड आहे. तत्वज्ञान, कामाची संस्कृती, व्यवस्थापन आणि धार्मिक ग्रंथ अशी विविध प्रकारची पुस्तके मी वाचतो.

■ आपला दिनक्रम कसा असतो?

पहाटे ५ वाजता उठून काही मित्रांबरोबर मी फिरायला जातो. आमच्या संशोधन आणि विकास प्रकल्प फार्मपाशी माझा नातूही यात सामील होतो. नंतर योगासने आणि ध्यानधारणा झाल्यावर सकाळी ८ पर्यत मी दैनंदिन कामाला लागतो. मोहाडी येथील घरी किंवा जैन हिल्सवर भेटीगाठी, पुढील योजनांची चर्चा, आखणी होते. ११ वाजता मी फॅक्टरीत जातो. तेथेच मुले, मित्र आणि काही सहकारी यांच्या बरोबर दुपारचे जेवण घेतो. नंतर थोडी वामकुक्षी घेऊन पुन्हा कामाला लागतो. सूर्यास्तापूर्वीच संध्याकाळचे जेवण घेऊन मग काही तास मी कुटुंबासमवेत घालवतो. घरी नातवांशी खेळतो. रात्री नातवाला घेऊनच मी व पत्नी फार्मवरील घरात झोपायला जातो.

■ □ ■

## CONTENTS



## ON THE COVERS


A profile of one of the most remarkable industrial pioneers of our time, Mr. Bhavarlal Jain of Jalgaon. Plus an exclusive interview, in which he talks to Network about current projects, his dreams for the future and his personal commitments .......... **9**

The personal preferences and starry dreams of young aspiring actress, Nashik's Siddhi. With a photo-feature and a preview of her tele-roles ............ **15**


## REGULARS


**Fiction** .............................35
Rainy Day Blues

**Food & Drink** .....................38
The 'tale' behind the hot-dog and other culinary legends

**Last word** ..........................41
Going doolally in Deolali


## FEATURES


NORTH-WEST Network

Volume III Issue 4
July – August 1994



**Focus** ........................19






Marriage Magic :

Nashikities on the special ingredients that go into the making of the ultimate in togetherness..... a happy marriage !






**Anniversary Focus** ............28


Network's 'Most Memorables'





## COLUMNS


**Viewpoint** ....................22
*R. Venkitachalam*
The Indian Marriage Act : On the more material aspects of matrimony Indian style

**Mathsline** ....................36
*D. K. Ghotkindikar*
Guessing games with a twist in the tail !

**Heart-to-Heart** ................37
*Nawaz & Bejon Desai*

**Beautyline** ....................39
*Jamila & Aziza*
A do-it-yourself facial massage



MARATHI COVER :
Bhavarlal Jain
Chairman
Jain Group of Industries
Jalgaon

PHOTOGRAPHY :
Ranjit Hira

ENGLISH COVER :
Siddhi

PHOTOGRAPHY :
Ranjit Hira

COVER GIRL LOOK :
Jamiza

PROCESSING :
Master Colour Lab

**Executive Editor** Ranjit Hira **Associate Editor** Priya Chaturvedi **Publishing Consultant** Dan Kent **Consulting Editor** Ravi Pichaya **Design** P. Venumadhav Reddy **Data Processing** Kamal Deep Singh **Editorial, Advertising & Circulation Address** NORTH-WEST NETWORK, Hira Processors & Publishers, Sukenkar Building, Opp. Hotel Panchavati, Nashik 422 001 **Phone** 71133 **Fax** (0253) 71600.

**JALGAON** Hema Milwani, 51, Laj Bhavan, Jilha Peth, Jalgaon 425 001, Phone (0257) 23560. **AHMEDNAGAR** Anurita Sakat, C/o. D-2, Akashwani Tower Quarters, Ahmednagar. **DHULE** Raosaheb Garud/Bageshri, Garud Baag, Dhule, Phone (02562) 24408, 24642.

Edited and Published by Rabia Hira for Hira Processors and Publishers, Shivangi, Off Trimbak Road, Nashik 422 002 and printed by her at Inconpaper, Shah-Nahar Industrial Estate, Lower Parel, Bombay.


Copyright reserved. Reproduction in whole or part without the written permission of the Editor is strictly prohibited.

Contributor's Note : The Editor does not accept responsibility for unsolicited manuscripts, illustrations or photographs. Only material with self-addressed, stamped envelopes will be returned. All rights in letters sent to NORTH-WEST NETWORK Magazine will be treated as unconditionally assigned for publication and copyright purposes and as subject to NORTH-WEST NETWORk's unrestricted right to edit and to comment editorially. No legal responsibility is accepted for any errors, omissions or misleading statements in the information given caused by negligence or otherwise. The views expressed in various sections are those of the authors and not of their companies or this magazine.

## BHAVARLAL JAIN

# LOOKING FORWARD, AIMING HIGH

An exclusive interview with the dynamic Chairman of the Jalgaon-based Jain group of Industries, Mr. Bhavarlal Jain. He talks to Network on a wide range of subjects, from new agricultural technology to his personal commitments and work ethic. With this interview we present here a profile of one of the country's most remarkable industrial pioneers

"Agriculture," says Bhavarlal Jain, " is the very soul of India's economy". He should know, for today, he is acknowledged as one of the country's leading pioneers in agricultural technology and methods that have changed the face of the parched earthscape around Jalgaon. His name is synonymous with the drip-irrigation technique, a system of controlled water management that can constitute the very backbone of India's agricultural advancement.

The success story of the Jain Group's founding father is a fascinating one : the stuff of which legends are made. And that seems appropriate enough for a man who has achieved the rare distinction of becoming a living legend. Though his start in life was with a law degree in his pocket, his destiny lay in the soil, since he was born into a long-established family of agriculturists in Vakod village, close to Jalgaon, the same land that nurtured, centuries ago, the exquisite art of Ajanta. He soon abandoned any ideas of making the law his profession, and with capital borrowed from his family, he started retailing kerosene as a sub-dealer of the American multinational, Esso.



A modest enough beginning, but for the young Jain, it was a challenge, a chance to learn and use aggresive marketing techniques and business methods, selling kerosene door-to-door at a price 50 percent lower than the market rate. Nor was Esso slow in recognising the extraordinary drive and potential of this young man, when it broke with precedent to award him 4 dealership agencies. From kerosene, he diversified into retailing auto- spares, petrol, diesel, domestic gas and lubricating oil. But the turning point came with his venture into the process of making the enzyme Papain from papaya milk. Papain, he discovered, was in universal demand as an essential ingredient used in breweries, food processing and pharmaceutical industries. The small venture grew and his company poured funds into R&D to develop deodorised, ultra-purified papain. Today, the Jain Group is the second largest producer of refined papain in the world, meeting 20% of the global demand.

The marketing of PVC pipes, again begun in a small way, saw some remarkable innovations : with high-capacity extrusion lines imported from Austria, the Jain Group added their own technical firsts to these already advanced machines such as pre-heaters and triple extrusion heads, which boosted production capacity by as much as 60%. These improvements were incorporated into the latest machines being produced in Austria. Today, the Jain Group is the single largest manufacturer of PVC pipes in the country.

This association with the farming sector led naturally to the next step : of acquiring drip irrigation systems built around PVC pipes. This technique, whereby precisely controlled amounts of water and other nutrients are directly applied to the root zones, offers enormous water resources and operating costs savings and a dramatic increase in productivity.

With the Group's net worth registering an annual average increase of 212% over the last decade; with a track record in financial management which has enabled growth and diversification at tearaway speed, it is reasonable to predict that by the year 2000 the turnover will reach the Rs. 1000 crore mark. However, in the words of the man whose credo is 'Work is Worship', "In my efforts to generate growth for my group I cannot lose sight of my basic commitments to a certain philosophy......to concentrate my investments in and around Jalgaon so that I can serve the community in the area of my birth....In fact, I have chosen to invest in businesses which also serve a social end like drip irrigation.... manufacture of foam sheets....(and those) which will all conserve scarce natural resources."

"I owe my growth to the soil and people of Jalgaon, and therefore it is my responsibility to reciprocate"

**How would you define your personal work philosophy?**

It is said in just three words, "Work is life". This is a statement depicting our work culture in the Group's corporate commandments.

**What are your plans for your birthplace, Jalgaon? When will your plan to start a management college bear fruit?**

I have chosen to have a commitment to make, as far as possible, all investments and locate our ventures in and around Jalgaon. I owe my growth to the soil and people of Jalgaon, and therefore it is my responsibility to reciprocate by ploughing the maximum I can to foster development and employment opportunity in this area.

In our priorities we are developing a training centre for advanced agricultural technology for use by farmers in India. After it is developed, we plan to extend it into a Rural Management Institute as a first step prior to fashioning a full- fledged Management Education Centre.

**You are known to be committed to key conservation issues. What concrete form has your commitment taken?**

It is true that we are committed to key conservation issues and our products represent it :

Micro Irrigation Systems conserve water.

The various plastic sheets we manufacture are wood substitutes.

We are going into production of solar heaters, which is another area of energy conservation.

**What are your views on the recently concluded GATT world trade negotiations and the Dunkel Draft?**

I have no doubt that the recently concluded GATT world trade negotiations and the Dunkel Draft would be to the advantage of economic growth, both for industries and the agricultural sector as far as the country is concerned. It is time we shed off our sheltered existence and got into the international mainstream. This would certainly attract a high degree of competitive pressures, but it is only such a challenge which can assure required advancement so badly desired to convert a developing economy into a devloped economy. I have no doubt Indians, both in the fields of industry and agriculture, can acquit themselves handsomely and prove equal in their offerings to match the best available in the world.

**What has held Indian industrialists back from achieving global domination in any field? Do we, as a nation, lack the professional approach to reach the top, internationally?**


Primarily it has been the government restrictions which had shackled the Indian industrialists from playing a global role in all fields. Once these shackles are broken and we are given equal opportunity, there is no question that Indian enterpreneurs would find a place of respect and success in the international market. We are equipped to absorb advanced technologies and since we are a low cost producing area, we have an edge in the international sphere over high cost developed economies. Should we be able to maintain our traditional Indian ethics we cannot fail to reach somewhere close to the top, globally, in next decade.

**You have successfully orchestrated the explosive growth of your business empire year after year. What would you say is the right mix for achieving such steady growth for other medium-sized groups in India, in today's economic climate?**

I believe it is primarily a spirit of entrepreneurship which counts for growth, and it is a combination of identifying an opportunity and willingness to assume a risk to materialise the wherealls to cash the opportunity. Additionally, this

## A Day in the Life of .........

**"I get up at about 5 a.m. and go for a morning walk with some friends and my grandson, who join me at our R & D farm; later do yoga and meditate for some time. By 8 o'clock I finish my morning routines and thereafter I start attending to my commitments. I receive visitors at our Mohadi residence or have discussions regarding development and progress of new projects at Jain Hills. By about 11, I go to the factory and attend to whatever requires my attention. I have lunch with my sons and some selected friends and colleagues in the factory. After lunch I take some rest. Thereafter I get back to work, but I finish the evening meal before sunset, go home and play with my grand-children and spend a few hours with my family, till I leave with my wife and grandson to retire for the night at my farm residence."**



spirit of entrepreneurship must be backed with a mind set, notwithstanding obstacles or other problems, to ensure that what is required will be done within time and within budget. The rest is a very mundane affair of managing resources.

* * *

Some glimpses into the private thoughts and opinions of Mr. Bhavarlal Jain in his persona as family man and loving grandfather

**Do you agree that as a nation we are not educating our children properly? What can be done about this?**

We, for the sake of our posterity, must reorient our educational system totally. We must shed off the remnants of the colonial system and refashion it for a vibrant, independent and growing nation. The whole system has been diseased with corruption and decay. There is no hope of salvage unless we change it to produce youth which is well educated and is committed to values that foster the achievement of results, hard work, integrity and dignity of labour.

**If you had a choice of sending your grandson to MIT or to Bombay's IIT, which would you opt for? How would you rate the best of our professional institutions against the best in the USA and UK? Why can't we set up world-class educational institutions in India?**


In my assessment our professional institutions can compare with the best in the world, provided they are allowed to operate without interference from self-seeking politicians and bureaucrats. Let them be managed by those who are competent to do so and these can then stand out as world class educational centres indeed.
As far as my grandson is concerned, he will decide where and what to study when he reaches that age.

**Do you have any activities unrelated to your work? Have you had the time to develop any hobbies?**

I read a lot and I contribute whatever time I can to promote community welfare. I believe the best an individual can do is to keep himself fit in body and mind so that he is able to contribute his best self in whatever task he may undertake. I certainly spare all the time I can for this purpose.

**Which are your five favourite books?**

I don't think it is possible to single out any favourite books. Except reading fiction, I enjoy reading various authors who deal with philosophy, work culture and management education, apart from Scriptures. ■



## THE ISRAELI TIE-UP

The Jain Group, this year, has signed some significant agreements with a country that has achieved the most stupendous success in agriculture : Israel. Speaking of these, Mr. Jain told Network : **"Jain foundation has signed an agreement with an agency of the Government of Israel to develop a centre for training of farmers in the Israeli way of agriculture, deploying advanced technologies. The first training under the aegis of Jain Foundation and CINADCO has commenced on June 13 '94. Use of these technologies would help in improvement of yields, quality of produce and thus result in better incomes for the agriculturists. Deployment of such technologies can also result in our producing agro-based products of international quality which can bring in substantial export earnings. This can also assist in our developing agro-based industries like food processing, with consequential favourable results for the agriculturist and for the national economy".**
Other technological know-how being acquired from Israel includes the pioneering of tissue culture technology and green-house concepts. New laboratories are being set up with the help of Israel's Rahan Meristan Group. Jalgaon farmers can expect to be supplied with high yielding Israeli banana varieties.